14

---

FRIDAY, 14TH MARCH 1958.

---

## L. C. BILL No. III OF 1958.

A BILL TO ESTABLISH AND INCORPORATE A TEACHING AND AFFILIATING UNIVERSITY AT AURANGABAD TO BE KNOWN AS THE MARATHWADA UNIVERSITY.

मुंबई विधानपरिषद नियमांपैकीं नियम ८८(१)च्या परंतुकान्वयें पुढील विधेयक प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

## सन १९५८ चें विधानपरिषद विधेयक ३ रें.

**औरंगाबाद येथें मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखण्यांत यावयाचें, अध्यापन कार्य करणारें आणि संलग्न करून घेणारें विद्यापीठ स्थापन करण्याबाबत व त्यास एकव्यक्तिभूत स्वरूप देण्याबाबत विधेयक.**

ज्याअर्थीं, औरंगाबाद येथें मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखण्यांत यावयाचें, अध्यापन कार्य करणारें आणि संलग्न करून घेणारें विद्यापीठ स्थापन करणें व त्यास एकव्यक्तिभूत स्वरूप देणें इष्ट आहे ;

त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षीं याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

### विभाग १.

### प्रारंभिक.

१. (१) ह्या अधिनियमास मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९५८ असें म्हणावें. लघु संज्ञा व सुरुवात.

(२) हें कलम ताबडतोब अंमलांत येईल.

(३) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाच्या बाकीच्या उपबंधांपैकीं सर्व किंवा कोणतेहि उपबंध अधिसूचनेंत जी तारीख किंवा ज्या तारखा निर्दिष्ट करण्यांत येतील त्या तारखेस किंवा त्या तारखांस अंमलांत येतील.

व्याख्या.

२. संदर्भाविरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर ह्या अधिनियमांत,—

(१) "संलग्न" म्हणजे कलमें ६ आणि ३४ अन्वयें संलग्न करून घेतलेलें ;

(२) "महाविद्यालय" म्हणजे पदवी महाविद्यालय ;

(३) "पदवी महाविद्यालय" या संज्ञेचा अर्थ, विद्यापिठाच्या कोणत्याहि पदवीकरितां पात्रता प्राप्त करून देणाऱ्या परीक्षेसाठीं विद्यार्थी पाठविण्यास अधिकृत केलेलें संलग्न महाविद्यालय, असा समजावा ;

(४) "माध्यमिक शाळा" या संज्ञेचा अर्थ, मुंबई राज्याच्या शिक्षण संचालकानें किंवा त्यानें याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यानें मान्यता दिलेली पूर्ण विकसित माध्यमिक शाळा असा समजावा आणि तींत अशा रीतीनें मान्यता दिलेली विविधोद्देशी माध्यमिक शाळा किंवा विद्यापिठानें नोंदलेली व मुंबई राज्याच्या बाहेर असलेली माध्यमिक शाळा यांचा समावेश होतो ;

(५) "वसतिगृह" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वयें विद्यापिठानें चालविलेलें किंवा मान्यता दिलेलें विद्यार्थ्यांचें निवासस्थान असा समजावा ;

(६) "प्राचार्य" म्हणजे महाविद्यालयाचा प्रमुख ;

(७) "मान्यता दिलेली संस्था" या संज्ञेचा अर्थ, जी संशोधनासाठीं किंवा विशिष्ट अभ्यासासाठीं स्थापन केलेली संस्था असून जिला विद्यापिठानें अशी संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे अशी संलग्न महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर संस्था असा समजावा ;

(८) "नोंदलेला स्नातक" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वयें नोंदलेला स्नातक असा समजावा ;

(९) "माध्यमिक शाळांचे शिक्षक" या संज्ञेचा अर्थ, माध्यमिक शाळांत शिक्षण देणाऱ्या ज्या शिक्षकांस परिनियमांन्वयें माध्यमिक शाळांचे शिक्षक म्हणून ठरविण्यांत येईल असा शिक्षकवर्ग, असा समजावा ;

(१०) "परिनियम", "अध्यादेश" आणि "विनियम" या संज्ञांचा अर्थ, विद्यापिठानें ह्या अधिनियमान्वयें केलेले आणि त्या त्या वेळीं अंमलांत असलेले अनुक्रमें विद्यापिठाचे परिनियम, अध्यादेश आणि विनियम असा समजावा ;

(११) "अध्यापक" या संज्ञेचा अर्थ, प्राध्यापक, प्रवाचक (रीडर), उप-अध्यापक (लेक्चरर) आणि विद्यापिठांत, संलग्न महाविद्यालयांत किंवा मान्यता दिलेल्या संस्थेंत शिक्षण देणाऱ्या ज्या इतर इसमांना परिनियमांन्वयें "अध्यापक" म्हणून ठरविण्यांत येईल असे इसम, असा समजावा ;

(१२) "विद्यापिठाचे अध्यापक" या संज्ञेचा अर्थ, विद्यापिठानें आपल्या वतीनें शिक्षण देण्यासाठीं नेमलेले किंवा मान्यता दिलेले अध्यापक असा समजावा ;

(१३) "विद्यापीठ" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वयें स्थापन केलेलें मराठवाडा विद्यापीठ असा समजावा ;

In. No. 1380
UNIBEC
Date. 18/8/04
Aurangabad

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र उस्मानाबाद येथे स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. बीएसयु-१२०३/(८८/०३)/विशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
दिनांक:- ५ ऑगस्ट, २००४.

वाचा:- १) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे पत्र क्र. सांख्यिकी/५/२००२/३४१५, दि. २६-८-२००२ व क्र. सांख्यिकी/५/२००४/२३८-४९, दि. २२ मे, २००४.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएसआय-१००४/७१०४२/विशि-१, दि. २५-५-२००४.

प्रस्तावना:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील उस्मानाबाद जिल्हा व बीड जिल्ह्याचा काही भाग विद्यापीठाच्या औरंगाबाद येथील मुख्यालयापासून फार दूर आहे. त्यामुळे त्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाने उस्मानाबाद याठिकाणी उपकेंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र उस्मानाबाद येथे स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली असून विद्यापीठाच्या प्रस्तावाप्रमाणे सदर उपकेंद्रात खालील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात येत असून प्रत्येक विभागासाठी प्रपाठकाचे १ व अधिव्याख्यात्यांची २ पदे याशिवाय जीव तंत्रज्ञान विभागासाठी प्राध्यापकांचे १ पद अशी एकूण १३ शिक्षकांची पदे विद्यापीठाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पदव्युत्तर विभागाचे नाव :-

१) इंग्रजी विभाग
२) शिक्षण शास्त्र विभाग
३) रसायन शास्त्र विभाग
४) सूक्ष्म जीवशास्त्र विभाग

सहा. कु. (२४/८/०४)
18/8/04

Pl. endorse
to ...

५) जीव तंत्रज्ञान विभाग
६) जल आणि भूमी व्यवस्थापन विभाग

२. वर नमूद केलेल्या शिक्षक पदांव्यतिरिक्त खाली नमूद केलेली शिक्षकेतर पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उप कुलसचिव | १०६५०-३२५-१५८५० | १ |
| २ | सहाय्यक कुलसचिव | ८०००-२७५-१३५०० | १ |
| ३ | अधीक्षक | ६५००-२००-१०५०० | ३ |
| ४ | वरिष्ठ सहाय्यक | ४५००-१२५-७००० | २ |
| ५ | कनिष्ठ सहाय्यक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | २ |
| ६ | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ५ |

३. शिक्षक पदांची वेतनश्रेणी विद्यापीठांतील शिक्षक पदांना शासनाने वेळोवेळी मान्य केल्याप्रमाणे राहील.

४. हे उपकेंद्र व त्यामधील पदव्युत्तर विभाग सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करावयाचे असल्यामुळे विद्यापीठाने वर नमूद केलेली पदे शासनाच्या आरक्षण धोरणानुसार त्वरीत भरावित. या पदांच्या वेतनावरील डिसेंबर, २००४ पर्यंतचा खर्च भागविण्यासाठी रु.२५.०० लाख व उपकेंद्रासाठी लागणारे फर्निचर व आवश्यक ते शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी रु.५.०० लाख अशी एकुण रु.३०.०० लाख रक्कम शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११०४/४४/अर्थसंकल्प-६, संगणक सांकेतांक ८०००-०४४-४, दि.५ ऑगस्ट, २००४ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात वित्त विभागाच्या वर नमूद केलेल्या दि.५ ऑगस्ट, २००४ च्या शासनाच्या क्रमांक लिहून त्या अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे व लाल शाईने अधोरेखित करावे.

५. यावरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा. व सुरुवातीला हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११०४/४४/अर्थसंकल्प-६, संगणक सांकेतांक ८०००-०४४-४, दि.५ ऑगस्ट,२००४ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु.३०,००,०००/- (रुपये तीस लाख फक्त) इतक्या अग्रीम रकमेतून भागविण्यात यावा व अंतिमतः तो सन २००४-०५ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. याबद्दील खर्च "२२०२, सर्वसाधारण शिक्षण-०३ विद्यापीठांस व उच्च शि १०२, विद्यापीठांना सहाय्य - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०७)(०७) सर्वस शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने (२२०२०७४५) मागणी क्रमांक डब्ल्यू-२ लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २००४-०५ या वर्षाच्या मंजूर तरत् भागवावा.

७. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.३६८/२००४/व्यय-५, दि.२९-७-२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( फु. स. भैरप्पा )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शास

प्रति,

राज्यपाल तथा कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
संचालक (उच्च शिक्षण) महा. राज्य, पुणे, (५ प्रती)
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा म मंत्रालयासमोर, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
सहसंचालक (उच्च शिक्षण) विभागीय कार्यालय, औरंगाबाद
नियोजन विभाग
वित्त विभाग व्यय-५, अर्थसंकल्प -३, अर्थसंकल्प-६, मंत्रालय मुंबई
साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
निवड नस्ती

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद येथे गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामविकास संस्था स्थापन करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बैठक-२०१६/प्र.क्र.१३७/विशि-२**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०१६.

<u>प्रस्तावना</u> :

गोपीनाथराव मुंडे ह्यांचा ग्रामीण विकासात सिंहाचा वाटा असल्या कारणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद विद्यापीठाने "गोपीनाथराव मुंडे नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ रुरल डेव्हलपमेंट" या नावाची संस्था स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. सदरहू संस्था ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत असून या विद्यापीठात ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या हेतूने सुरुवातीपासून समाजशास्त्र विभाग, अर्थशास्त्र विभाग, राज्यशास्त्र विभाग या शैक्षणिक विभागाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, व यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निधी मंजूर करुन घेतला जातो. तसेच विद्यापीठात एन.एस.एस. च्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे विविध उपक्रम राबविले जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद या विद्यापीठाअंतर्गत गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने ग्रामविकास संस्था सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाने दि. ०४.१०.२०१६ च्या बैठकीत तत्वत: मान्यता दिलेली आहे.

वरील बाबी विचारात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाअंतर्गत "गोपीनाथराव मुंडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट" या नावाची संस्था स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्रस्तावनेतील बाब विचारात घेवून शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे:

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे श्री.गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामविकास संस्था, औरंगाबाद येथे स्थापन करण्याच्या अनुषंगाने वित्तीय व इतर अनुंषगिक बाबी तपासण्याकरिता प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून सदर समितीने इमारत बांधकाम, शिक्षकेतर पदे तसेच आवर्ती व अनावर्ती खर्चाबाबतचा अहवाल शासनास सादर केल्यानंतर त्या अनुषंगाने नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील व त्यानुसार श्री.गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामविकास संस्था, औरंगाबाद येथे स्थापन करण्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरहू कार्यवाही तातडीने करण्यात येईल. वरील बाबींच्या अधीन राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामविकास संस्था, औरंगाबाद येथे स्थापन करण्याच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१३१८०३२६३४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Siddharth Rambhau Kharat

Digitally signed by Siddharth Rambhau Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharth Rambhau Kharat
Date: 2016.10.19 15:01:55 +05'30'

**(सिध्दार्थ खरात)**
उपसचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
३) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५) मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव,कृषी विभाग,यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
६) मा. मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव,वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
७) मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
८) मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबइ.
९) मा. प्रधान सचिव,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
१०) मा. सचिव,ग्रामविकास व पंचायतराज विभाग,बांधकाम भवन, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
११) कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
१२) कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,परभणी.
१३) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
१४) संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पूणे.
१५) सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद.
१६) उपसचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण,यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
१७) निवड नस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय,मुंबई

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नॅक समिती तर्फे बी+ दर्जा प्राप्त

कार्यालय : (०२४०) २४०३११४ ते १२१
बीसीयुडी कार्यालय : (०२४०) २४०३२२३
कुलसचिव कार्यालय : (०२४०) २४०३३३४
फॅक्स (०२४०) : २४०३-२२४/३३५
तारा : बामूसिटी
ई- मेल : bcud.office@bamu.ac.in
संकेत स्थळ : bamu. net

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद - ४३१ ००४.
(महाराष्ट्र)


क्र. सांख्यिकी/१/२०१३-१४/4607-10

दिनांक:-०५/०८/२०१३ 6

प्रति,

डॉ. जी. डी. खेडकर,

सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

विषय:- Paul Hebert Centre for DNA barcoding and Biodiversity Studies सुरु करणे बाबाच्या प्रस्तावावर दि.२९/०६/२०१३ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेने घेतलेल्या निर्णया बाबत.

संदर्भ:- आपण डॉ. अशोक मोहेकर, अधिष्ठाता विज्ञान विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिले पत्र क्र. GDK/PHCDBS-Dean/०३/१७ दि. २३/०३/२०१३ रोजीचे पत्र.

महोदय,

वरिल विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, Paul Hebert Centre for DNA barcoding and Biodiversity Studies बाबतच्या प्रस्तावावर दि. २९/०६/२०१३ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदने खालील प्रमाणे निर्णय पारीत केलेला आहे.

"अधिष्ठाता विज्ञान विद्याशाखा डॉ. अशोक मोहेकर यांनी Paul Hebert Centre for DNA barcoding and Biodiversity Studies यांनी संबंधी केलेली शिफरस मान्य करण्यात आली. सदरील विभागास नव्याने इमारत, आवश्यकते मनुष्यबळ, फर्निचर व इतर सुविधा देण्यात येऊन या केंद्रास स्वंतत्र केंद्राचा दर्जा देण्यात येऊन प्रस्तावा नुसार त्यांचे स्वंतत्र कामकाज होईल. हे केंद्र चालवण्यासाठी मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली स्वंतत्र सल्लागार मंडळ राहील. या केंद्राचे संचालक म्हणून डॉ.गुलाब खेडकर राहतील, आजपर्यंतच्या केंद्रासाठी, त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन डॉ. गुलाब खेडकर यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात येत आहे."

करिता सदरील निर्णय आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत करण्यात येते आहे.

आपला विश्वासू,

संचालक

महाविद्यालये व विद्यापीठ

विकास मंडळ

संतपीठ, पैठणचे शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे सोपविण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्र. संतपी-२०२०/प्र.क्र.९८/विशि-२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२१.

वाचा :- १) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.संतपी-०५९२/प्र.क्र.१७७/सां.का.२, दि.०६.१२.१९९४.

२) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.संतपी-२०००/प्र.क्र.२१/सां.का..२, दि.१८.०१.२००१.

३) संचालक, उच्च शिक्षण यांचे दि.०९.०२.२०२१ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

मराठवाडा विकासाच्या ४२ कलमी कार्यक्रमातंर्गत पैठण जि.औरंगाबाद येथे संतपीठ स्थापन करण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर संतपीठाचे पंजीकरण मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० अधिनियम क्र.२९ अन्वये दि.१७.०१.१९९९ रोजी झाले आहे. संतपीठासाठी श्री.ज्ञानेश्वर उद्यान परिसर, पैठण येथील १७.८ एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. सदर जमीन जायकवाडी पक्षी अभयारण्यातून महसूल व वन विभागाच्या दि.२८.११.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे विमुक्त करण्यात आली आहे. सदर संतपीठ सुरु करण्यासाठी संतपीठाची प्रशासकीय इमारत, वसतीगृह, वाचनालय इत्यादी वास्तु उभारण्यासाठी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये रु.६ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संतपीठाची प्रशासकीय इमारत व दोन वसतिगृह सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांच्यामार्फत बांधून तयार आहेत. तद्नंतर दि.०६.०४.२०१७ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत संतपीठ हा विषय सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याविषयी चर्चा झाली. या चर्चेच्या अनुषंगाने दि.०१.०८.२०१७ रोजी संतपीठ हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद जिल्ह्यातील विविध विकास कामांचे सादरीकरण अंतर्गत संतपीठ, पैठण बाबत दि.०९.०९.२०२१ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संतपीठ, पैठण चे शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे सोपविण्याबाबतची बाब शासनाच्या विधाराधीन होती.

**शासन निर्णय ;-**

सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार पैठण संतपीठामध्ये भारतीय परंपरा व संस्कृती, संतसंप्रदाय, संतसाहित्य, किर्तन, प्रवचन, तत्वज्ञान या बाबीशी संबंधित विविध प्रमाणपत्र/पदविका/पदवी/पद्वयुत्तर अभ्यासक्रम चालविण्यासाठी संतपीठाचे शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे ५ वर्षासाठी, किंवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे लवकर होईल ते, सोपविण्यात येऊन संतपीठ कार्यान्वित करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१. विविध प्रमाणपत्र/पदविका/पदवी/पद्वयुत्तर अभ्यासक्रमांना आवश्यक त्या प्राधिकारणांकडून मान्यता घेण्यात यावी.

२. निरनिराळ्या संप्रदायाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यास घटकाची निवड करुन अभ्यासक्रमांची निर्मिती करावी.

३. प्रत्येक संप्रदायाच्या अभ्याक्रमांना संतपीठात योग्य ते स्थान देण्यात यावे.

४. सदर संतपीठाकरीता शासन निधीतून कोणतेही नविन पद तयार करता येणार नाही.

५. अभ्यासक्रम चालविण्यासाठी विद्यापीठाने आवश्यकतेनुसार या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची मानधन तत्वावर/तासिका तत्वावर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी कंत्राटी स्वरुपात बाह्यस्त्रोतामार्फत उपलब्ध करुन घेऊन याकरिता येणारा आवर्ती खर्च विद्यापीठाने सद्यस्थितीत स्वनिधीतुन उपलब्ध करुन द्यावा.

६. संतपीठ या संस्थेच्या जागेची तसेच इमारतीची मालकी शासनाकडेच राहणार असून, फक्त शैक्षणिक उपक्रम राबविण्याकरीता ही इमारती विद्यापीठास सोपविण्यात येत आहे.

७. इमारतीचा रखरखाव विद्यापीठाने करावा. तसेच अभ्यासक्रम चालविण्यासाठी आवश्यक साहित्य विद्यापीठाने उपलब्ध करुन द्यावे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०९१७१४५१४५४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=880d8eb755bcb4455fa360baaa8797820b6265d75275a72f9fa31977bfeff4c9, serialNumber=99eb928028df71ebdfcd2898e209d499192ad3899261fead42f7d38a3141ab69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2021.09.17 14:53:39 +05'30'

**( अ. म. बाविस्कर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
५) सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे/ औरंगाबाद.
६) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
७) महालेखापाल, (लेखा परीक्षण) -१/२ महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
८) अधिदान व लेखा अधिकारी, पुणे/ औरंगाबाद.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/औरंगाबाद.
१०) नियोजन विभाग (१४७१), मंत्रालय, मुंबई.
११) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-३)/(व्यय-५) मंत्रालय, मुंबई.
१२) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१३) मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१४) मा.प्रधान सचिव. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१५) उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१६) निवड नस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.